NA order

श्री. बी. डी. टेळे, तहसिलदार, नागपूर (ग्रामीण) यांचे कार्यालय, नागपूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

रा. मा. क्र. १५८/एन.ए.पी.-३४/२०२३-२०२४
मौजा – **पिपळा**, प. ह. नं.- **३८**
दिनांक- **२४ मे, २०२४**

वाचा : मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अधिकार प्रदान आदेश क्रं.प्रस्तुत/कावि-१४६९/२२, दि. १९/०९/२०२२.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६, च्या कलम -४२-अ मधील तरतुदीन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटदारास द्यावयाचा सनदेचा नमुना.

ज्याअर्थी, जिल्हा- नागपूर, तालुका-नागपूर (ग्रामीण), मौजा - **पिपळा,** प. ह. नं.- **३८** च्या शेत सर्व्हे क्रमांक **१०४ पार्ट, १०५, १०६, १०७, १०८ पार्ट, १०९, ११०,** इन्सारा मेट्रोपार्क आराजी **९४४९४.०९ चौ. मी. (७/१२), ९४४९४.०९ चौ. मी. ("क" नुसार) व ९४६६०.७० चौ. मी. (जागेवर उपलब्धतेनुसार)** या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम **४२-अ** च्या तरतुदीन्वये, **"निवासी"** अकृषक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास **प्रशासक, नगर पंचायत बेसा-पिपळा** यांचे मंजूरी अहवाल जा.क्र.न.प.बे.पि./नरवि/अभि.तात्पु.मंजु./८९ दि.- **१०/०४/२०२४**, अन्वये विकास/बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे. ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदेसोबत संलग्न आहे. तात्पुरते मंजूर अभिन्यासाच्या क्षेत्राचे विवरण खालील प्रमाणे आहे.

AREA STATEMENT				
1.	**AREA OF PLOT** (MINIMUM AREA OF A,B,C TO BE CONSIDERED)	94494.09	SQ.M	
	A) AS PER OWNERSHIP DOCUMENT (7/12, CTS EXTRACT)	94494.09	SQ.M	
	B) AS PER MEASURMENT SHEET	94494.09	SQ.M	
	C) AS PER SITE	94660.70	SQ.M	
2.	**DEDUCTIONS FOR**			
	A) PROPOSED D.P./D.P. ROAD WIDENING AREA/SERVICE ROAD/ HIGHWAY WIDENING	0.000	SQ.M	
	B) ANY D.P. RESERVATION AREA	0.000	SQ.M	
	C) EXTERNAL STRUCTURE IN PLOT	0.000	SQ.M	
	D) NOT IN POSSESSION	0.000	SQ.M	
	(TOTAL A+B+C+D)	0.000		
3.	**BALANCE AREA OF PLOT (1-2)**	94494.09	SQ.M	
4.	AMENITY SPACE			
	A) REQUIRED	4724.70	SQ.M	
	B) ADJUSTMENT OF 2(B), IF ANY	----		
	C) PROPOSED	4760.02	SQ.M	
5.	NET PLOT AREA (3-5B)	89734.07	SQ.M	
6.	RECREATIONAL OPEN SPECE/PLAY GROUND **(IF APPLICABLE)**			
	A) REQUIRED	9449.41	SQ.M	
	B) PROPOSED	9655.62	SQ.M	
7.	INTERNAL ROAD AREA (NET PLOT –(PLOTABLE AREA + OPEN SPACE + MSEB + EXTERNAL STRUCTURE))	23699.83	SQ.M	
8.	SERVICE ROAD AND HIGHWAY WIDENING	----	SQ.M	
9.	**PLOTABLE AREA**	56280.25	**SQ.M**	
10.	PORO-RATA FACTOR FOR FSI CALCULATION ON LAYOUT PLOTS	1.59	SQ.M	

11.	AREA FOR INCLUSIVE HOUSING			
	A) REQUIRED	----	SQ.M	
	B) PROPOSED	----	SQ.M	

ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४७-अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमुद **"निवासी"** अकृषक प्रयोजनार्थ वापरापोटी आकारणीची रक्कम पुढील प्रमाणे निर्धारित करण्यात येते.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकूण क्षेत्रफळ/आराजी **९४४९४.०९ चौ. मी. (७/१२), ९४४९४.०९ चौ. मी. ("क" नुसार) व ९४६६०.७० चौ. मी. (जागेवर उपलब्धतेनुसार) "निवासी"** प्रयोजनार्थ अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच **६१०४०.२७ चौ.मी.**(AREA UNDER PLOT **५६२८०.२५** + AMENITY SPACE PROPOSED **४७६०.०२** = **६१०४०.२७**) चौ. मीटरला **१०** पैसे प्रति चौ. मीटर याप्रमाणे अकृषक महसूल कर रुपये **६,१०५/-**, ग्रामपंचायत कर अकृषक करा एवढा रुपये **६,१०५/-**, जिल्हा परिषद सेस सारा **७** पट अकृषक कराच्या रुपये **४२,७३५/-** परावर्तीत कर अकृषक साऱ्याचे **५** पट म्हणजेच रुपये **३०,५२५/-** असे एकूण रुपये **८५,४७०/-** आकारणी निर्धारित होते.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तदन्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटदारास सदर नियोजन प्राधिकाऱ्यावर वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनूज्ञेय करण्यांत आलेल्या **"निवासी"** अकृषक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम **४२-अ** अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, यांनी दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ही सनद देण्यात येत आहे.

१. आकारणी उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसूली योग्य असलेल्या आकराणी ऐवजी वर उल्लेखीत विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक **३१ जूलै, २०२४** (वर्ष) रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी रुपये **६,१०५/-** (रुपये **सहा हजार एकशे पाच** फक्त) या दराने परिगणीत होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडून, वेळोवेळी निश्चित करण्यांत येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२. उक्त जमिनीचा भोगवटदार उक्त जमिनीवर वसूली योग्य असलेली सर्व कर, दर आणि उपकर भरील.

३. वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमीनीच्या वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४. सदर जमिनी या नागरी जमीन कमाल धारणा व कोर्ट ऑफ वार्डस मध्ये बाधित होत असल्यास सदर अकृषक आकारणी रद्द करण्यात येईल.

५. उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तदन्वये, करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोटकलम (२) च्या अधिनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यानंतर उक्त जमीन भोगवटदार यांच्या वहीवाटीत असल्याचे चालू ठेवता येईल.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

त्याची साक्ष म्हणून **नागपूर** जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी/जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे वतीने स्वाक्षरी केली आहे, आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुद्धा दिनांक- **२४ मे, २०२४** रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

(भोगवटादाराची स्वाक्षरी)
लक्झुरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. तर्फे
श्री. उमेश नारायण पाटणकर

(साक्षीदारांची स्वाक्षरी व नांव)
अ) _____
श्री. अमितकुमार विजयकुमार अग्रवाल
ब) _____
श्री. संजय अमर बानिया

(साक्षीदारांची स्वाक्षरी व नांव)
अ) _____
श्री. अमितकुमार विजयकुमार अग्रवाल
ब) _____
श्री. संजय अमर बानिया

आम्ही जाहीर करतो की, ज्याने सनदेवर स्वत: अर्जदार **लक्झुरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. तर्फे श्री. उमेश नारायण पाटणकर, रा. प्लॉट नं. ९१, रिंग रोड, पोलीस चौकी, राणा प्रताप नगर, नागपूर** यांनी स्वाक्षरी केलेली आहे. ती अ व ब व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्यची स्वाक्षरी केलेली आहे.

स्वा/-
(बी. डी. टेळे)
तहसिलदार,
नागपूर (ग्रामीण)

प्रतिलीपी :

१. मा. जिल्हाधिकारी, नागपूर (अकृषक शाखा) यांना माहितीस सविनय सादर.
२. प्रशासक, नगर पंचायत, **बेसा-पिपळा** यांना माहितीस अग्रेषीत.
३. ग्राम अधिकारी सा. क्रं. **३८**, मौजा — **पिपळा** यांना सदर आदेशाची नोंद गाव नमुना-२ मध्ये नोंद घेण्यास व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
४. सह. जिल्हा निबंधक श्रेणी — २, क्रं. ७ व १० नागपूर (ग्रामीण) यांना माहितीकरीता अग्रेषित.
५. उप अधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर (ग्रा.) यांना माहितीस व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
६. अर्जदार **लक्झुरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. तर्फे श्री. उमेश नारायण पाटणकर, रा. प्लॉट नं. ९१, रिंग रोड, पोलीस चौकी, राणा प्रताप नगर, नागपूर** यांना माहिती तथा उपरोक्त अटी व शर्तीच्या पुर्तता व अंमलबजावणी करण्यास रवाना.

तहसिलदार,
नागपूर (ग्रामीण)

कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा

ता. नागपूर(ग्रा.), जि. नागपूर email:-npbesapipla@gmail.com

MA & demarcation letter.

जा.क्र. न.प.बे.पि/नरवि/अभि.तात्पु.मंजु/८९

दिनांक:- ३०/ ०४ /२०२४

प्रति,

मा. तहसिलदार,
नागपूर (ग्रा), तहसिल कार्यालय,
जिल्हा. नागपूर.

विषय :- मौजा :- पिपळा, प.ह.न. ३८, खसरा क्र. १०४ पार्ट, १०५, १०६, १०७, १०८ पार्ट, १०९, ११०, इन्सारा मेट्रोपार्क आराजी ९४४९४.०९ चौ.मी. (७/१२), ९४४९४.०९ चौ.मी. ('क' प्रत नुसार) व ९४६६०.७० चौ.मी. (जागेवर उपलब्धतेनुसार) जागा 'निवासी' वापरास अकृषक व आखणी करिता परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार यांचे online BPMS प्रणाली वरील अर्ज क्र. BPNM-24-18115, दि. 15/03/2024.
२. अर्जदाराचे अर्ज दिनांक १०/०४/२०२४ रोजीचा अर्ज क्र. २८२४.

महोदय,

विषयांकित प्रकरणातील जागा **'निवासी' वापरार्थ** अकृषक करणे प्रकरणी अभिन्यास मंजूरीचे प्रकरण सदर्भांकित अर्जान्वये प्राप्त झाले आहे.

बेसा-पिपळा ही नवीन नगर पंचायत स्थापन झालेली असुन बेसा-पिपळा नगर पंचायतीचा अद्यापपर्यंत विकास आराखडा तयार झालेला नाही. सदर भागाकरिता याआधी **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण** क्षेत्राकरीता शासनाने दिनांक ०५/०१/२०१८ रोजी मंजूर केलेली विकास योजना लागु असुन उक्त जागा **"निवासी-३ व निवासी-४, १८.०० मी. डी. पी. रोड व ROS"** या उपयोगाने प्रस्तावित आहे. संदर्भाधिन पत्रासोबत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकरणाच्या अभिन्यासाला अकृषक व आखणी कामी तात्पुरती मंजूरी प्रदान केली आहे. अर्जदाराने सुपरविजन शुल्क रु. ९,०८,७०१/- चा भरणा न.प. पावती क्र. ११५, दिनांक ०५/०४/२०२४ अन्वये केलेला आहे. उक्त जागेला फक्त "निवासी" वापराकरीता तात्पुरती मंजुरी देण्यात येत असुन सदर जागा अकृषक व आखणी करण्याकरीता खालील अटीवर शिफारस करण्यात येत आहे.

१. अभिन्यासातील भूखंडाचा उपयोग फक्त "निवासी" वापरा करिताच करण्यात यावा तसेच भूखंडा विभाजन करू नये.
२. सभोवतालचे मजूर अभिन्यासातील रस्त्याशी योग्यरितीने समन्वय साधणे आवश्यक आहे.
३. अभिन्यासाची जागेवरील प्रत्यक्ष आखणी केल्यानंतर अभिन्यासातील राखून ठेवलेल्या खुल्या जागे क्षेत्रफळ अभिन्यासातील जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १० टक्के पेक्षा कमी असु नये.
४. अभिन्यासातील जागेत काही वृक्ष असल्यास, भूखंड आखताना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.

विषयांकित जमिनीतून विद्युत वाहिनी / दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहिनी प्रस्तावाला बाधित होणार

नगर पंचायत बेसा-पिपळा Bhavat जि. नागपूर

नाही अशा रितीने संबधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानांतरीत करावी लागेल.

६. सदर रेखाकनामधील प्रस्तावित बांधकामास दिनांक ०२/१२/२०२० रोजी शासनद्वारे मंजूर विकास नियंत्रण प्रोत्हासन नियमावली लागू राहील.

७. विषयांकित जागेलगत / जागेतून पाण्याचे स्त्रोत जात असल्यास संबंधित पाटबंधारे / जलसिंचन विभागाच ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

८. पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

९. जमीनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावर खात्री करून घेणे आवश्यक राहील.

१०. अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठयाची व्यवस्था जमिन मालक / विकासक यांनी स्वतःचे खर्चाने करणे आवश्यक राहील. अभिन्यासात निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा (Black & Grey Water) पुनर्वापर करण्यासाठी (बगीचा, लॅन्डस्केपिंग, विशींग फिश पॉड रस्ते सफाई, संडास व मुतारीत उपयोगासाठी व धुण्यासाठी) सांडपाणी व सांडपाण्याची प्रक्रीया करून विल्हेवाट करण्याची व्यवस्था जमिन मालक/ विकासक यानी स्वतःचे खर्चाने करणे आवश्यक राहील.

११. अभिन्यासातील रस्ते, मलवाहिका पावसाळी पाण्याची नलिका, जल वाहिनी, स्ट्रीट लाईट इत्यादि योग्य प्रकारे विकसीत करून ती संबधित नगर पंचायतीच्या नियमानुसार हस्तांतरीत करावे लागतील जेव्ह पर्यन्त विकास कामे नगर पंचायतीस हस्तांतरित होत नाही तेव्हा पर्यन्त जमीन मालकाने देखभाल दुरुस्तीची कामे करावी लागेल.

१२. विषयांकीत जागेवर बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकाम नकाशे नगर पंचायत बेसा-पिपळा कडून मंजूर करून घ्यावे लागेल.

१३. अभिन्यासाला अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यावर नगर पंचायत बेसा-पिपळा सोबत विकास करारनामा करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

१४. सार्वजनिक मलनिस्सारण संयंत्र आणि अनुषंगिक बाबींकरीता लागणारे शुल्काचे अंशदानाचा भरणा करावा लागेल.

१५. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 (MRTP Act 1966) चे कलम 124 (ब) (2-1ए) नुसार उक्त जागेच्या प्रचलित शिघ्रगणन मुल्य दराने येणारे एकुण मुल्याच्या ०.५ टक्के मुल्य जमीन विकास फंड (Land Development Fund) करिता अर्जदार / विकासकाकडून घ्यावे लागेल. या शिवाय अर्जदार यांना अंतिम मंजूरी पूर्वी नगर पंचायत ने निश्चित केल्याप्रमाणे रहिवासी-३ व रहिवासी- ४ करिता आवश्यक पायाभूत सुविधा शुल्क (infrastructure Cost) चा भरणा करावा लागेल. तसेच नगर पंचायत बेसा-पिपळा कार्यालयात इतर आवश्यक शुल्क भरणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

१६. अभिन्यास नकाशात दर्शविल्याप्रमाणे वेस्ट वॉटर रिसायकलिंग ट्रिटमेंट प्लॅन्टचे बांधकाम व इलेक्ट्रीक सबस्टेशन लावणे विकासकास अनिवार्य राहील.

१७. रस्त्याच्या बांधकामासाठी तटबंदी (Embankment) २ मीटर पेक्षा जास्त उंचीचे असल्यास त्याचा भरणा करण्यासाठी फ्लाय ॲश चा वापर करण्यात यावा व तसेच प्राकलन तयार करण्यात यावे.

१८. फ्लाय ॲश नी बनवलेली टाईल्स, पेविंग ब्लॉक, विटा, सिमेंट इ बांधकाम साहित्याचा उपयोग अनिवार्य राहील.

१९. अभिन्यासामध्ये घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे स्वखर्चाने बांधकाम करून त्याची निगा व देखभाल

राखण्याची जवाबदारी अभियान धारक/विकासकावर राहील.

२०. या अभिन्यासाच्या लगतचे अभिन्यास मंजूरीच्या वेळी त्या अभिन्यास धारकाला विकासकाच्या अभिन्यासातील रस्त्यामधून पोच रस्ता द्यावा लागेल.

२१. एकत्रीकृत विकास नियंत्रण नियमावली मधील तरतूदीनूसार सदर जागेवरील अभिन्यासातील ९. ००मी रस्ता रुंदीकरणाखालील जागा नगर पंचायतीस विनामुल्य हस्तांतरीत करावी लागेल. तद्नंतर भुमी अभिलेखात प्राधिकरण/जिल्हाधिकारी यांचे नावे हस्तांतरीत करावी लागेल. उक्त प्रक्रीयेतर सदर जागा सार्वजनिक रस्त्याचा भाग होईल व मंजूर एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतूदीनूसार FSI अनुज्ञेय होईल.

२२. विकास करारनामा प्रमाणे प्रथम टप्यातिल बांधकाम/भूखंड मुक्त करण्याकरिता या विभागास अर्ज सादर करावे.

२३. मालकी हक्का बाबत सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुसरून सदर परवानगी देण्यात येत आहे. अर्जदार यांनी सादर केलेले कागदपत्रे खोटे आठळून आल्यास सदर परवानगी रद्द करण्यात येईल व अर्जदार यांचे वर कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२४. सदर जागेची मोजणी भुमी अभिलेख कार्यालयाकडून करून घेणे आवश्यक राहील.

२५. सदर जागेची अंतिम मंजुरीपूर्वी विक्री करता येणार नाही.

२६. अर्जदार यांनी अभिन्यास मंजूरी करिता सादर केलेला हमीपत्राचे अधिण राहूण.

२७. अर्जदार यांनी सादर केलेला Edelweiss Asset Reconstruction यांचे पत्र दिनांक ३०/११/२०२३ व बैंक ऑफ बडौदा यांचे पत्र दिनांक ०२/१२/२०२३ यांचे अधिण राहूण.

२८. मा. संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांची अधिसूचना क्र.:- जा.क्र. प्रा.यो.नागपूर/मौ.पिपळा/ ए.न.व.प्र./टिपीव्ही-२/३०२४, दिनांक २३/०६/२०२३ चे अधिण राहूण.

अभिन्यासाची प्रत या कार्यालयामार्फत यासह पाठविण्यात येत आहेत. कृपया उक्त जागेची अकृषक करनिर्धारण प्राप्त झाल्यानंतर अकृषक आदेशाची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी ही विनंती.

सहपत्र :- अभिन्यास नकाशा दोन प्रत

प्रशासक
नगर पंचायत बेसा-पिपळा

प्रतिलिपी -

१. मा. उप अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर (ग्रा) यांना सदर निवासी अभिन्यासाची मोजणी करिता सविनय सादर.

२. कनिष्ठ अभियंता नगर पंचायत बेसा-पिपळा यांना पुढील करवाहीसाठी अग्रेषीत.

३. लक्झोरा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. तर्फे श्री. उमेश नारायण पाटणकर, प्लॉट नं. ९१, रिंग रोड, पोलिस चौकी, राणा प्रताप नगर, नागपूर.

नगर पंचायत बेसा-पिपळा जि. नागपूर

प्रशासक
नगर पंचायत बेसा-पिपळा